Chairman
**Vidyadhar Anaskar**
M.Com., D.T.L., D.L.L. & L.W., LL.B.

Vice Chairman
**Ramakant Khetan**
B.Sc., LL.B.

Chief Executive & Secretary
**Sou. Sayali Bhoir**
B.Com., G.D.C. & A., LL.B., C.A.I.I.B

**The Maharashtra Urban Co-op. Banks' Federation Ltd.**
(Regd. No. BOM-GNL-8 of 9th March 1979)
Bharatiya Krida Mandir, 4th Floor,
Wadala, Mumbai - 400 031. P. B. No. 7120,
Tel. : 022 - 2413 5797, Fax : 022 - 2415 1185
E-mail : admin@mucbf.com ● www.mucbf.com

परिपत्रक: एमयुसीबीएफ/ ३८/ २/ २०१६-१७
दि. २ मे,२०१६

**प्रति,**
**मा.अध्यक्ष / मुख्य कार्यकारी अधिकारी**
सर्व सभासद नागरी सहकारी बँका
महाराष्ट्र राज्य.

विषय: **सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार-सन २०१६.**
**फेडरेशनच्या सभासद नागरी सहकारी बँकांनी माहिती पाठविणेबाबत.**

**महोदय / महोदया,**

**फेडरेशनच्या अनेक उपक्रमांपैकी असाच एक उपक्रम म्हणजे, सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार!**
दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशनतर्फे दरवर्षी सहकारी बँकींग क्षेत्रात उत्तम कामगिरी करणाऱ्या सभासद नागरी सहकारी बँकांना त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना विविध पुरस्कार प्रदान करुन गौरविण्यात येत असते. बँकेला मिळणारा हा पुरस्कार केवळ त्या संस्थेच्याच लौकिकात भर घालीत नाही तर सर्व संचालक, व्यवस्थापन, कर्मचारी तसेच सभासद, ग्राहक व हितचिंतक यांना नवे चैतन्य/आनंद मिळवून देत असतो.

आपणांस कळविण्यात येते की, सालाबादप्रमाणे यंदाही महाराष्ट्रातील फेडरेशनच्या सभासद नागरी सहकारी बँकांमधून 'उत्कृष्ट काम' करणाऱ्या बँकांची निवड करुन **'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार-सन २०१६'** वितरणाचा कार्यक्रम करण्याचे फेडरेशनने योजीले आहे. या स्पर्धेत जास्तीत जास्त बँकांना भाग घेता येऊन आपल्या उत्तम कामगिरीच्या जोरावर पुरस्कार प्राप्त करुन भविष्यात बँकेच्या कामकाजात अधिकाधिक चांगली प्रगती करण्यास उत्तेजन मिळावे, याकरिता पुरस्काराकरिता खालीलप्रमाणे गट विभागणी करण्यात आली आहे.

१) माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कामगिरी केलेल्या बँका
२) महिला गटातील बँका
३) पगारदार नोकरांच्या गटातील बँका
४) रु.१००० कोटीच्या वर ठेवी असलेल्या बँका
५) रु.६०० कोटीचे वर ते रु.१००० कोटी पर्यंत ठेवी असलेल्या बँका
६) रु.३५० कोटीचे वर ते रु.६०० कोटी पर्यंत ठेवी असलेल्या बँका
७) रु.१०० कोटीचे वर ते रु.३५० कोटी पर्यंत ठेवी असलेल्या बँका
८) रु.५० कोटीचे वर ते रु.१०० कोटी पर्यंत ठेवी असलेल्या बँका
९) रु.५० कोटी पर्यंत ठेवी असलेल्या बँका
१०) युनिट बँका
११) विशेष पुरस्कार (दि.१एप्रिल,२०१६ नंतर शेड्युल्ड दर्जा प्राप्त झालेल्या बँका, तसेच माहे मार्च,२०१६ रोजी संचित तोटा भरुन नफा प्राप्त केलेल्या बँका)
१२) गौरव प्रशस्तिपत्र (दि.१एप्रिल,२०१६ पासून नव्याने/प्रथमत: शतकोत्तर वाटचाल करीत असलेल्या आर्थिकदृष्टया सक्षम व उत्तम व्यवस्थापन असलेल्या बँका)

अशा एकूण १२ गटातील बँकांना पुरस्कार देवून गौरविण्यात येणार आहे.